जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 MAR 2020
तरुण भारत

# छत्रपती शिवाजी महाराज यांनी मराठीचे रक्षण केले

## प्राचार्य डॉ. आय. एच. पठाण: वारणा महाविद्यालयात 'मराठ्यांचा मध्ययुगीन इतिहास'वर व्याख्यान

प्रतिनिधी
वारणानगर

छत्रपती शिवाजी महाराज हे स्वयंभू व्यक्तिमत्व होते. सत्य-असत्य, धर्म-अधर्माच्या कसोटीवर खरे उतरलेले ते महान राजे होते. तत्कालीन उर्दू, फारसी भाषेचा मोठा प्रभाव असतानाही त्यांनी मराठी भाषा रक्षणाचे काम केले. भाषिक, सांस्कृतिक आक्रमण रोखण्यासाठी शिवाजी महाराज यांनी राजव्यवहार कोशाच्या माध्यमातून भाषेला उर्जितावस्था प्राप्त करून दिली, असे विचार इतिहास संशोधक डॉ. आय. एच. पठाण यांनी काढले.

वारणानगर येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयामध्ये मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्यावतीने सुरू असलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाराज, मराठा इतिहास व्याख्यानमालाअंतर्गत 'मराठ्यांचा मध्ययुगीन इतिहास' या विषयावर डॉ. आय. एच. पठाण यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या आधी स्वातंत्र्य असे काही नव्हतेच. स्वराज्य संकल्पक शहाजी राजे आणि स्वराज्य निर्माता छत्रपती शिवाजी महाराजांमुळे स्वातंत्र्याची कल्पना अंमलात आली.



वारणानगर : वारणा महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमालेत बोलताना ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ. आय. एच. पठाण. डावीकडून उपप्राचार्य पी. एस. पाटील, डॉ. वासंती रासम, प्राचार्य डॉ. सुरेखा शहापुरे.

राजमाता जिजाऊंच्या मार्गदर्शनाखाली वयाच्या बाराव्या वर्षापासून शिवाजी महाराज यांनी स्वराज्यनिर्मितीसाठी अहोरात्र ध्यास घेतला. शिवाजी महाराज हे एक श्रेष्ठ मानसशास्त्रज्ञही होते. डच, पोर्तुगीज आणि इंग्रज यांचा हेतू त्यांनी ओळखला होता. ते व्यापारासाठी नाहीतर राजकीय स्वार्थासाठी देशात येत आहेत हे त्यांनी पक्के ओळखले होते, असे पठाण यांनी सांगितले. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्यासाठी सर्वप्रथम अन्नछत्रालयाची संकल्पना महाराजांनी अंमलात आणल्याचेही पठाण यांनी नमूद केले.

उपस्थित मान्यवरांना प्राचार्य डॉ. सुरेखा शहापुरे यांच्या हस्ते सहकारमहर्षी तात्यासाहेब कोरे यांचा 'मी एक कार्यकर्ता', हा ग्रंथ देऊन गौरव करण्यात आला. संयोजन सहाय्य प्रा. डॉ. प्रकाश चिकुर्डेकर, डॉ. बी. के. वानोळे, प्रबंधक बाळासाहेब लाडगावकर, सुभाष शिरगावे, विजय खिलारे यांनी केले. शाहीर रंगराव पाटील आणि सहकारी यांचा 'शिवशाही ते लोकशाही'वर शाहिरी कार्यक्रम संपन्न झाला.

वारणा विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. विनय कोरे यांनी शुभेच्छा दिल्या. वारणा भगिनी मंडळाच्या उपाध्यक्ष स्नेहा कोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपप्राचार्य पी. एस. पाटील, माजी प्राचार्य डॉ. एस. एस. पाटील, डॉ. के. जी. जाधव, कोल्हापूर अर्बन बँकेचे निवृत्त शाखाधिकारी अनील कसबेकर, निवृत्त अधिकारी कृष्णाजी साळोखे यांनीही विशेष उपस्थिती दर्शविली. संयोजन मराठी विभागप्रमुख डॉ. सर्जेराव जाधव यांनी केले.

### समानतेचे तत्त्व

मध्ययुगीन काळातील मराठ्यांचा इतिहास हा ज्वलंत राष्ट्रप्रेमावर आधारित आहे. त्याचे नेतृत्व छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. साधी राहणी, सर्वधर्मसमभाव, उदात्त विचारसरणीच्या जोरावर त्यांनी रयतेचे राज्य अस्तित्वात आणले. भारतीय लोकशाहीचे ते जनक होते. त्यावेळचे मुस्लीम राजे धार्मिक भेदाभेद करत परंतु महाराजांनी ते कधीही केले नाही. प्रतापगड ते पन्हाळा-कोल्हापूर क्षेत्रातील मंदिर, मशिदी, मठांचे अनुदान त्यांनी समानतेच्या तत्त्वावर सुरू ठेवले, अशी माहिती पठाण यांनी दिली.

# माझ्या कामामागे राष्ट्रीय सेवा योजनेची प्रेरणा

## आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी यांनी उलगडला प्रभावी जीवनप्रवास



डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी

सकाळ वृत्तसेवा

कळंबा, ता. २ : माझ्या आतापर्यंतच्या स्वच्छताविषयक कामामागे शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेची प्रेरणा राहिली आहे. या योजनेच्या माध्यमातून माझ्यावर जे संस्कार झाले, त्यामुळेच मी हे करू शकलो, असे सांगत कोल्हापूर महापालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी आपला जीवनप्रवास उलगडला.

'अक्षर दालन' आणि 'निर्धार' यांच्यावतीने आयोजित १०५ व्या 'अक्षरगप्पा' कार्यक्रमाच्या निमित्ताने आयोजित प्रकट मुलाखतीमध्ये त्यांनी आपला जीवनपटच अगदी मनमोकळेपणाने उलगडला.

कलशेट्टी म्हणाले, ''मी महाविद्यालयात असताना शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट सदस्य झालो. राष्ट्रीय सेवा योजनेचा कार्यकर्ता ते प्राध्यापक अशा जबाबदाऱ्या पार पाडल्या. तिथे समाजाची सेवा करण्याचे आणि तीही प्रामाणिकपणे याचे बाळकडू मिळाले.''

सोलापूर जिल्ह्यातील वळसंग हे खेडेगाव. कलशेट्टी पाचवीत असताना वडील वारलेले. घरात सहा बहिणी. परिस्थिती गरिबीची. अशाही परिस्थितीमध्ये एम.एस्सी.बी.एड्. नंतर प्राध्यापक म्हणून नोकरी. हे करत असताना वकिलाचाही अभ्यास, माजी मंत्री सिध्दराम म्हेत्रे यांच्याविरोधातील महाविद्यालयीन निवडणूक आणि विजय याची उजळणी कलशेट्टी यांनी केली. रवींद्र जोशी यांनी स्वागत केले. यावेळी रवींद्र उबेराय, जी. पी. माळी, मानसी दिवेकर, उदय कुलकर्णी, व्ही. एन. शिंदे, अरविंद राणे, राम देशपांडे, सुशील हंजे, राजश्री साखळे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.